CMYK

बीड । मंगळवार

२२.०७.२०२५

वर्षे : ५ अंक : ११२

किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● https://marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■






dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955



# सुनील तटकरेंनीच मराठा द्वेषातून छावा कार्यकर्त्यांवर हल्ला घडवून आणला: मनोज जरांगे पाटील



**वडीगोद्री। प्रतिनिधी**

छावा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष विजय घाडगे यांच्यावर झालेल्या हल्ल्यामागे राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांचा हात असल्याचा गंभीर आरोप म राठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी (दि.२१) केला आहे.

अंतरवाली सराटी येथे पत्रकारांशी बोलताना जरांगे पाटील म्हणाले की, आम्हाला शंका आहे की हा हल्ला तटकरे यांनीच घडवून आणला आहे. यातून त्यांच्या मनातील मराठा द्वेष स्पष्टपणे दिसून येतो. त्यांनी पुढे सांगितले, विजय घाडगे हे शेतकऱ्यांचे लेकरू आहे. जर ते शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी गेले, तर त्यांना मारहाण केली जाते. हे आम्ही सहन करणार नाही, असा इशाराही त्यांनी यावेळी दिला. जरांगे पाटील यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना आवाहन केले की, अशा प्रकारच्या हल्लेखोरांना केवळ पदावरूनच नव्हे, तर पक्षातूनही हाकलून द्यावे. अशा लोकांना मोठ्या पदांवर ठेवणे चुकीचे आहे. याचा फटका पक्षालाही बसू शकतो.

दरम्यान, छावा संघटनेचे विजय घाडगे आणि इतर पदाधिकाऱ्यांनी लातूरमध्ये सुनील तटकरे यांच्या पत्रकार परिषदेनंतर कृषिमंत्री कोकाटे यांच्या विरोधात प्रतिकात्मक कृती म्हणून पत्ते फेकले होते. त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी विजय घाडगे यांच्यावर आणि इतरांवर मारहाण केली. या घटनेनंतर राज्यभरातून संताप व्यक्त केला जात आहे

दरम्यान, मृत महादेव मुंडे यांच्या पत्नीने सांगितले की, ज्ञानेश्वरी मुंडेंना न्याय मिळावा यासाठी ते रस्त्यावर उतरणार आहेत. आज त्या विजय घाडगे यांना भेटण्यासाठी लातूर आणि परळीला जाणार असल्याचेही त्यांनी सांगितले.



## पूर्ण नियोजन आणि परफेक्ट कार्यक्रम करुन स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत शिवसेनेचा भगवा फडकवा: बाप्पूसाहेब मोरे

**● बीडमध्ये शिवसेनेची आढावा बैठक संपन्न!**

**बीड । प्रतिनिधी**

तळागाळातील माणसांची जाणीव असणारे महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब स्व कर्तृतवाने घरघरात पोहचले. सन्माननीय शिंदे साहेब पूर्ण ताकदीने आपल्या सोबत आहेत. यामुळे आता थांबायचे नाही तर पूर्ण नियोजन आणि परफेक्ट कार्यक्रम या सूत्रनुसार आपल्याला ▶ उर्वरित पान २ वर



**● अनिलदादांनी रंगशिंग फुंकले!**

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे साहेबांच्या संस्कार आशीर्वादांचे तेज, महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते सन्माननीय एकनाथजी शिंदे साहेब आणि संसदरत्न खासदार डॉ. श्रीकांत शिंदे साहेब यांचे सहकार्य ताकद व तमाम शिवसैनिकांच्या साथीने येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पूर्ण ताकदीने लढवणार असून संपूर्ण बीड जिल्हा भगवामय करणार असल्याचे सांगत शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे रणशिंग फुंकले आहे.

## परळीच्या प्रभारी गटशिक्षण अधिकारीपदी बी. के. नांदुरकर

**बीड । प्रतिनिधी**

परळी पंचायत समितीचे प्रभारी गटशिक्षणाधिकारी श्रीराम कनाके यांच्याविषयी शिक्षक आणि संघटनेमध्ये असंतोष असल्याने त्यांच्या विषयी अनेक तक्रारी होत्या. जिल्हा परिषद प्रशासनाने या तक्रारीची दाखल घेऊन सोमवार दिनांक २१ जुलै २०२५ रोजी परळीच्या प्रभारी गट शिक्षणाधिकारी पदावर



बी. के. नांदुरकर यांची नियुक्ती केली आहे. यासंदर्भात शिक्षक संघटनेच्या पदाधिकाऱ्याने म्हटले आहे की, श्रीराम कनाके यांनी पुढाऱ्यांची हुजरेगिरी करून प्रभारी गटशिक्षणाधिकारी म्हणून अतिरिक्त पदभार मिळविला आहे.

माजलगाव पंचायत समितीला शिक्षण विस्तार अधिकारी असतांना कामचुकारपणा आणि ▶▶ उर्वरित पान २ वर

## धारूर खरेदी विक्री संघाच्या १९ पैकी १८ जागा बिनविरोध ; महिला प्रतिनिधीची एक जागा रिक्त

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

धारूर तालुका खरेदी विक्री संघावर गेल्या अनेक वर्षापासून प्रशासक होता या संस्थेचा निवडणूक कार्यक्रम नुकताच जाहीर झाला होता उमेदवारी अर्ज काढण्याचे शेवटच्या दिवशी अजितदादा राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार प्रकाश दादा सोळंके,राष्ट्रवादीचे रमेशराव आडसकर व राष्ट्रवादीच्या वाटेवर असलेले राजाभाऊ मुंडे या तीघांनी एकत्र येऊन ही निवडणूक बिनविरोध करण्यास पुढाकार घेतला व १८ संचालक वाटाघाटी करून बिनविरोध निवड केल्याने ही संस्था राष्ट्रवादी काँग्रेसच्या ताब्यात गेली आहे.१९ पैकी १८ संचालक निवडण्यात आले व महीला प्रतिनिधीची एक जागा रिक्त राहील्याने १८ संचालक बिनविरोध निवडण्यात आले. यामुळे तालूक्याचे राजकारणाची दिशा बदलली असून भाजपाला तालूक्यात अस्तीत्व टिकवणे साठी या पुढे संघर्षाची पाळी येणार आहे. धारूर तालुका खरेदी-विक्री संघावर गेल्या अनेक वर्षापासून प्रशासकीय राज होते गट महिन्यात निवडणूक कार्यक्रम जाहीर होऊन याची निवडणूक प्रक्रिया सुरू झाली १९ जागा साठी ५३ उमेदवाराचे अर्ज आले होते आज अर्ज ▶ उर्वरित पान २ वर

## न रडता लढणं हा गुण दिव्यांगांकडून घेण्यासारखा: आ.संदीप क्षीरसागर

### बीड येथे दिव्यांग व जेष्ठ नागरिक पूर्वतपासणी शिबीर



**बीड । प्रतिनिधी**

शारिरीक व्यंगामुळे पावलोपावली संघर्ष असताना न रडता कायमस्वरूपी लढणं हा प्रेरणादायी गुण दिव्यांगांकडून घेऊन आयुष्यात अवलंबण्यासारखा आहे. असे प्रतिपादन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले. बीड येथील दिव्यांग व जेष्ठ नागरिक पूर्वनोंदणी शिबीरात अध्यक्षीय समारोपात ते बोलत होते. यासोबतच बीड विधानसभा मतदारसंघ क्षेत्रातील बीड शहर, बीड ग्रामीण आणि शिरूर कासार तालुक्यातील उर्वरित दिव्यांग बांधव व जेष्ठ नागरिकांनी पूर्वनोंदणी करून घेण्याचे आवाहनही आ.क्षीरसागर यांनी केले आहे. जिल्हा परिषद समाजकल्याण विभाग व अलिम्को संस्था ▶▶ उर्वरित पान २ वर

## दक्षिण आफ्रिकेचे परमपूज्य रामगोविंद स्वामी महाराज यांनी केले वैकुंठ द्वाराचे उद्घाटन



**बीड । प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय कृष्ण भावनांवर संघ ,श्री श्री राधागोविंद मंदिर ,सावता माळी चौक,या ठिकाणी दक्षिण आफ्रिकेचे परमपूज्य रामगोविंद स्वामी महाराज यांच्या द्वारे वैकुंठद्वाराचे उद्धाटन करण्यात आले. रविवार दिनांक २० जुलै रोजी भक्तांच्या सहभागातून श्री श्री राधा गोविंद मंदिर बीड या ठिकाणी सुमारे दहा लाख रुपयांचे वैकुंठ द्वार बसविण्यात आले.त्याचे उद्धाटन करण्यासाठी दक्षिण आफ्रिकेवरून परमपूज्य रामगोविंद स्वामी महाराज, इस्कॉन सोलापूरचे अध्यक्ष श्री. कृष्ण भक्त प्रभू व इस्कॉन बीड चे अध्यक्ष श्री.विठ्ठल आनंद प्रभू ▶▶ उर्वरित पान २ वर

## खड्डा झाला पालकमंत्री तर बाकी खड्डे पालकमंत्र्याची पिलावळं

### नवं पर्वाची थीम घेऊन मिरवणाऱ्यांना बारामती दाखवा : उल्हास गिराम

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहर मरणयातना भोगत आहे. उघडे रोहित्र, उघड्या नाल्या, सर्वत्र खड्डे, कचऱ्याचे ढिगारे, शहरवासियांच्या पिण्याच्या पाण्याचं नियोजन या सारख्या शेकडो समस्या म्हणजे शहरवासियासाठी मरणयातनाचं, पालकमंत्री म्हणून अजितदादा पवार ▶▶ उर्वरित पान २ वर















CMYK

# महाराष्ट्राच्या राजकारणातील ग्रँडमास्टर : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

राजकारण केवळ भावनांवर नव्हे, तर वेळेवर घेतलेले अचूक निर्णय, रणनीती, दूरदृष्टी, संयम आणि विरोधकांच्या प्रत्येक चालीला योग्य प्रत्युत्तर देण्याची क्षमता यावर चालतं. आज महाराष्ट्राच्या राजकारणात ज्यांनी रणनीती, दूरदृष्टी, धैर्य आणि संयम यांचा संगम साधला आहे, अशा व्यक्तिमत्वाचं नाव म्हणजे देवेंद्र फडणवीस. महाराष्ट्राच्या राजकारणातील 'राजकीय ग्रँडमास्टर' म्हणून ओळखले जाणारे फडणवीस हे केवळ भाजपचे वरिष्ठ नेते महाराष्ट्राचे मुख्यमंत्री नाहीत, तर त्यांनी राज्याच्या राजकारणाला कलाटणी देणारे महत्त्वाचे निर्णय, योजनांची अंमलबजावणी आणि सत्ता-संवाद यामधून आपला वेगळा ठसा उमटवला आहे. त्यांच्या वाढदिवसानिमित्त, महाराष्ट्राच्या या राजकीय बुद्धिबळपटूचा प्रवास थोडक्यात मांडण्याचा एक प्रयत्न.

२०१४ सली लोकनेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे यांच्या निधनानंतर विधानसभा निवडणुकीला सामोरे जात असताना विविध रणनीतीचा वापर केला. त्यामध्ये लोकनेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे यांच्या कन्या पंकजा मुंडे यांच्या नेतृत्वाखाली 'पुन्हा संघर्ष यात्रा' काढली. तसेच गोपीनाथराव मुंडे यांनी युतीची केलेली महायुती ही देखील अधिक घट्ट करण्यावर भर देऊन महाराष्ट्रामध्ये सामाजिक समीकरणे आणि विभागीय समतोल साधत महायुती अधिक भक्कम केली. २०१४ हे वर्ष महाराष्ट्राच्या राजकारणात क्रांतिकारी ठरले. भाजपने पहिलेच स्वबळावर सर्वाधिक जागा जिंकल्या.



तत्कालीन मुख्यमंत्री होण्यासाठी एकनाथ खडसे, सुधीर मुनगंटीवार, पांडुरंग फुंडकर, पंकजा मुंडे, विनोद तावडे, अशी अनेक नाव होती, परंतु पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाने देवेंद्र फडणवीस यांच्यावर विश्वास दाखवत त्यांना मुख्यमंत्रीपदाची संधी दिली. आणि याच संधीच सोन करत केंद्रीय नेतृत्वाचा विश्वास संपादन करण्यात देवेंद्रजी फडणवीस यशस्वी झाले.

ते राज्याचे दुसऱ्या क्रमांकाचे सर्वात तरुण मुख्यमंत्री ठरले. त्यांच्या कार्यकाळात 'जलयुक्त शिवार', 'स्टार्टअप इंडिया', 'डिजिटल महाराष्ट्र', मेट्रो प्रकल्प, नागपूर-मुंबई समृद्धी महामार्ग यांसारख्या योजना राबवून त्यांनी विकासाला गती दिली. तसेच त्यांनी सर्वसमावेशक आणि विकासाभिमुख धोरण स्वीकारले. मराठा आरक्षणाचा मुद्दा, शेतकऱ्यांसाठी कर्जमाफी, रोजगार निर्मिती, पायाभूत सुविधा यांसारख्या विषयांवर त्यांनी ठोस पावले उचलली. त्यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राने एरीशे ष ऊेळपस ईीेळपर्शीी मध्ये देशात अव्वल स्थान पटकावले. फडणवीस हे निर्णयक्षम नेतृत्वाचे प्रतीक मानले जातात. त्यांनी प्रशासनात पारदर्शकता, डिजिटलायझेशन आणि योजनांची प्रत्यक्ष अंमलबजावणी यावर भर दिला.

पुढे २०१९ च्या निवडणुकीत त्यांनी पुन्हा युतीसह बहुमत मिळवले, परंतु नंतर शिवसेनेने वेगळा मार्ग स्वीकारला. तरीही, देवेंद्र फडणवीस यांनी संयम आणि धैर्य दाखवत त्यावेळी त्यांनी विरोधी पक्षात बसणे पसंद केले आणि ते विरोधी पक्षनेते झाले. त्यानंतर २०२२ मध्ये पुन्हा एकदा राजकीय समीकरणांची पुनर्रचना करत तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील सरकार पाडले. त्यावेळी शिवसेनेत अक्षरशः उभी फूट पडली . शिवसेनेच्या मोठ्या संख्येने आमदारांनी पक्ष नेतृत्वाविरुद्ध बंड केल्यानंतर, बंडखोरांचे नेते एकनाथ शिंदे यांना सोबत घेऊन सरकार स्थापन केले. त्यावेळी मुख्यमंत्री पदावर स्वतः देवेंद्र फडणवीस हेच असणार हे जवळपास निश्चित असतानाही अनेक घडामोडीनंतर त्यांना उपमुख्यमंत्री पद स्वीकारावे लागले. सुरुवातीला, सरकार स्थापनेपूर्वी, फडणवीस यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की ते वैयक्तिकरित्या नवीन सरकारचा भाग राहणार नाहीत, जरी भाजप त्यात सामील होईल. अनेक राजकीय टीकाकारांनी उपमुख्यमंत्रीपद हे फडणवीसांसाठी पदावनती किंवा पदावनती असल्याचे अधोरेखित केले होते. तरीही, भाजपच्या वरिष्ठ नेतृत्वाने एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेवर नियंत्रण ठेवण्यात सरकारमधील त्यांची भूमिका महत्त्वाची असल्याचे टीकाकारांनी मान्य केले. भाजप-शिंदे गटाच्या माध्यमातून सत्ता स्थापन केली. हे त्यांच्या कुशल राजकीय रणनीतीचे उत्तम उदाहरण होते. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह महाराष्ट्राचे ९ वे उपमुख्यमंत्री म्हणून त्यांनी शपथ घेतली. या काळात, त्यांनी गृह, कायदा आणि न्यायव्यवस्था, जलसंपदा, कमांड एरिया डेव्हलपमेंट , ऊर्जा, नवीन आणि अक्षय ऊर्जा आणि प्रोटोकॉल यासह प्रमुख मंत्रालये सांभाळली.

राजकारण करताना कायम बेरजेचे राजकारण करायचे हा मंत्र जपत त्यांनी महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री नारायण राणे, अशोकराव चव्हाण, राधाकृष्ण विखे पाटील, छत्रपती उदयनराजे भोसले, छत्रपती शिवेंद्रराजे भोसले, हर्षवर्धन पाटील, राणा जगजितसिंह पाटील, यांच्यासारख्या अनेक राजकीय दिग्जांना भाजपात घेत पक्ष मजबूत केला तर आ. गोपीचंद पडळकर, सदाभाऊ खोत, प्रसाद लाड, प्रवीण दरेकर, नितेश राणे यांच्यासारख्या समर्थक सहकाऱ्यांना सोबत घेऊन महाराष्ट्रात राजकीय कुरघोडी करणाऱ्यांना जशास तसे उत्तर देण्यासाठी टीम देवेंद्र कायम सज्ज ठेवली. याबरोबरच सोशल मीडियाची यंत्रणा अधिक सक्षम केली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नावासोबत 'ग्रँडमास्टर' ही उपमा सहज जोडली गेली नाही. कारण त्यांनी वेळोवेळी राजकीय पटावर असे अनेक डाव खेळले आहेत, जे इतरांना आश्चर्यचकित करणारे ठरले. २०१९ मध्ये अवघ्या तीन दिवसांचा मुख्यमंत्रीपदाचा कार्यकाळ असो, किंवा शिवसेना - एनसीपीच्या हालचालींचा पूर्ववेध घेऊन केलेल्या रणनीती यात त्यांचे राजकीय चातुर्य दिसते. ते पक्षाचे दिल्लीतील नेतृत्वाशी उत्तम समन्वय राखत, महाराष्ट्रातील भाजपला संघटनेपासून सरकारपर्यंत बळकट करत आहेत. विकास आणि सामंजस्याचा मंत्र घेऊन देवेंद्र फडणवीस हे विकासाभिमुख विचारांचे नेता म्हणून ओळखले जातात. त्यांनी विरोधकांशीही राजकीय मतभेद असूनही अनेकदा संवादाची दारे उघडी ठेवली. त्यांचा स्वभाव संयमी असून, प्रशासनात शिस्त व परिणामकारकता यावर त्यांनी नेहमी भर दिला. आज देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त, त्यांच्या राजकीय कारकिर्दीचा मागोवा घेताना हे स्पष्ट होते की, ते केवळ नेते नाहीत, तर एका नव्या महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी झटणारे दूरदृष्टीचे योजक आहेत. महाराष्ट्राच्या राजकारणातील हा ग्रँडमास्टर पुढील काळात कोणते डाव खेळेल, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. महाराष्ट्राच्या उज्ज्वल भविष्यासाठी त्यांच्या यशस्वी वाटचालीला मनःपूर्वक शुभेच्छा! आज सन्माननीय मुख्यमंत्री श्री देवेंद्रजी फडणवीस साहेबांचा वाढदिवस.... साहेब, आपणास वाढदिवसाच्या हार्दिक - हार्दिक शुभेच्छा!!!

**- अमोल तांदळे, चौसाळा**

## पान ४ वरून पुढे...

### विजेचा शॉक..

न दिसल्याने त्याचत् पाण्यात याचा पाय पडला आणि विजेचा जबरदस्त शॉक बसून तो खाली कोसळला आणि जागीच त्याचा मृत्यू झाला त्यावेळी त्याचे अपंग वडील वैजनाथ सानप हे जवळच शेतात काम करीत असल्यामुळे त्यांनी त्याला पाहिले आणि ते त्याच्या दिशेने गेले तर तो खाली पडलेला त्यांना दिसला तेव्हा त्यांनी मोठ्याने आरडाओरड केल्याने आजूबाजूची शेतातील लोक धावत पळत आले आणि काही जणांनी विजेच्या डीपी कडे जाऊन तेथील फ्युज काढल्या आणि नंतर खाजगी वाहनाने त्याला बीड सिविल हॉस्पिटल मध्ये दाखल करण्यात आले. तेथील डॉक्टरांनी त्याला तपासून मृत घोषित करण्यात आले. पुढील सर्व कारवाई करून मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला. महावितरणाच्या गलथन कारभारामुळे एका तरुण युवकाचा बळी गेला वेळीच जर महावितरण कंपनीने तार व्यवस्थित जोडून दिली असती तर एका गरीब कुटुंबातील युवकाचा मृत्यू झाला नसता. महावितरण कंपनी वर योग्य ती कारवाई करून त्या गरीब कुटुंबाला न्याय मिळवून देण्यात यावी हीच सर्व स्तरातून मागणी होत आहे. खडकवाडी तालुका पाटोदा येथील तरुण युवक वैभव वैजनाथ सानप याच्या जाण्याने खडकवाडी गावावर आणि परिसरातील सर्व गावावर शोक कळा पसरली असून सर्व स्तरातून हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. गरीब ऊसतोड कुटुंबाला न्याय मिळावा हीच अपेक्षा.

### युवा सेनेने...

पालकमंत्री प्रताप सरनाईक आले, त्यांच्या हस्ते वृक्ष लागवड हा मुख्य कार्येक्रम झाला आणी ताटकळत बसवण्यात आलेल्या या विद्यार्थ्यां पैकी प्रतिनिधीक स्वरूपात पाच सहा विद्यार्थी यांना बोलावण्यात आले मंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते हसत हसत छत्र्या वाटप करतांनाचे फोटो सेशन झाले ह्या फोटो शेशन वेळी छत्री वाटप हा विशेष कार्येक्रम ठेवणारे पदाधिकाऱ्यांनी देखील जग जिंकल्याचे भाव असणारे फोटो यावेळी काढले. आता या नंतर आपल्या सगळ्यांना छत्र्या मिळणार या

## पान ४ वरून पुढे...

आशेवर आणलेले विध्यार्थी होते. मात्र या विद्यार्थ्यांच्या आशेवर पूर्ण पाणी फेरले गेले कारण पालकमंत्री महोदयांनी प्रतिनिधीक स्वरूपात पाच सहा विध्यार्थी यांना छत्र्या वाटप करून ते पुढच्या नियोजित कार्येक्रमास निघून गेले आणी छत्र्या वाटप कार्येक्रम ठेवणाऱ्या मराठवाडा युवा सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी ह्या छत्र्या या अजाण विध्यार्थ्यांना न वाटता आपल्या कार्येकर्त्यांना वाटायला सुरुवात केल्या आणी खास ह्या वाटपाच्या कार्ये क्रमासाठी दोन ते अडीच तासापासून ताटकळत बसलेल्या विदयार्थ्यांच्या मात्र हिरमोड ह्या छत्री वाटपाच्या कार्येकर्मात मराठवाडा युवा सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी केला. बरं ह्या आपल्या कार्येकर्त्यांना एक एक छत्री भेट दिली असती तर ठीकही होत. मात्र एका एका कार्येकर्त्याकडे पाच पाच छत्र्या, कोणाकडे आठ दहा छत्र्या देखील बघायला मिळाल्या, हा आरोप नाही तर याच चित्रिकरण होऊन नामवंत न्यूज चॅनेल ने याच प्रक्षेपण केलं आहे. आपला नेता खूश व्हावा आणी कार्येकर्ता देखील खुश राहावा अशा उद्धेशाने हा छत्री वाटपाचा कार्येक्रम युवा सेनेचे मराठवाडा समन्वयक बाजीराव चव्हाण यांनी घेतला अशी माहिती मिळत आहे. बऱ्याच छत्र्या तर फोटो सेशन होताच ह्या पदाधिकाऱ्यांनी आपल्या गाडीत नेहून ठेवलेल्या दिसून आल्या. या प्रकाराची व्हिडिओ कुणीतरी काढली तर त्या व्हिडिओ मध्ये ह्या छत्र्या आम्ही पुढच्या कार्येक्रमासाठी घेऊन चाललो आहे असं देखील एक कार्येकर्ता सांगताना दिसून येतो आहे. बिचारे आशेवर आणुन ताटकळत बसवलेले विदयार्थी तसेच निघून गेले आणी युवा सेनेच्या कार्ये कर्त्यांचीच झुंबड ह्या छत्र्या लुटण्यासाठी बघायला मिळाली. नेमका हा कार्येक्रम नेत्यांला खूष करण्यासाठी बाजीराव चव्हाण यांनी घेतला हे स्पष्ट आहे. मात्र हा कार्येक्रम आपल्या नेत्यांसह आपल्या जवळच्या कार्ये कर्त्यांना देखील खुश करण्यासाठी आयोजित करण्यात आला होता हे कालच्या छत्री वाटप कार्येकर्मा नंतरच्या दिसणाऱ्या दृशावरून दिसून येत आहे. युवा सेनेचे मराठवाडा निरीक्षक बाजीराव चव्हाण यांनी घेतलेल्या या अगळ्या वेगळ्या छत्री वाटप कार्येकर्माची चवीने चर्चा सुरु झाली आहे. कालच्या छत्री वाटपाच्या कार्येकर्मात उभ्या महाराष्ट्राने बघितले की आता नेता भी खूश और पब्लिक भी खूश असं नाही तर नेता भी खूश और कार्ये

## पान ४ वरून पुढे...

कर्ता भी खूश असं आहे ते...

### नगररोडवर अपघात...

महामार्गावरील दुभाजक नसल्याने होत असलेले अपघात त्यांच्या डोळ्यांना दिसत नाहीत का? त्यांना मोतिबिंदू झालाय का? असा संतप्त सवाल सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केला आहे. बीड शहरातून जाणारा धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्ग बाह्यवळणाद्वारे वळवण्यात आला असला तरी शहरातील १२ किमी रस्त्याची अवस्था अत्यंत बिकट आहे. हा रस्ता फक्त दोन लेनचा असल्याने वाहतुकीची कोंडी होते. दुभाजक नसल्याने वाहने कोठूनही वळतात आणि अपघातांचा धोका वाढतो. या रस्त्याचे चौपदरीकरण मागील सहा वर्षांपासून रखडले आहे. दोन वर्षांपूर्वी मजबुतीकरणाचे काम झाले, पण रस्ता अरुंदच राहिला. फक्त बसस्थानक-महावितरण कार्यालय आणि बसस्थानक-जिल्हा रेशीम कार्यालय दरम्यानच दुभाजक आहेत; उर्वरित रस्त्यावर दुभाजक नाहीत. या मार्गावर तासाभरात हजारो वाहने धावतात - बस, खासगी गाड्या, दुचाकी, रिक्षा, मालवाहू ट्रक. पावसाळ्यात मातीमुळे वाहने घसरतात, राष्ट्रवादी भवन ते बार्शी रोडवर तर जागोजागी खड्डे आहेत. म्हणूनच या मार्गावर तातडीने दुभाजक बसवावेत, सिग्नल व्यवस्था सक्षम करावी, आणि चौपदरीकरणाचे काम त्वरीत सुरू करावे, अशी ठाम मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली आहे.

### मोफत वाळु...

सोमवार दि.२१ रोजी नगरपालिकेत बैठक आयोजित केली होती. यावेळी मुख्याधिकारी विक्रम मांडुरके, यांच्या सोबत मागील जनता दरबाराती विषयावर चर्चा करण्यात आली.आज झालेल्या आढावा बैठकीत उपस्थित नागरिकांनी घरकुल योजनेंतर्गत लाभार्थीना हाप्ता वितरण करण्यात यावे अशी मागणी केली,तर शहरातील अनेक भागात स्टेट लाईट बंद आसल्याचे सांगितले तर अनेक भागात कमी दाबाने

## पान ४ वरून पुढे...

पाणी येत आसल्या बाबत सागितले तसेच अनेक वॉर्डात घंटागाडी येत नसल्याच्या सुध्दा तक्रारारी यावेळी बोलतांना सागीतले आहे तर घरकुलासाठी मोफत वाळु संदर्भात मागणी केली. नागरिकांनी मांडल्या यासंदर्भात मुख्याधिकारी यांनी लक्ष घालून काही दिवसात अडचणी दुर करावेत अशा सुचना लोकनेते बाळराजे पवार यांनी बैठकी दरम्यान केली. याविषय मुख्याधिकारी विक्रम मांडुरके यानी सर्व विभागाला तक्रारारी निवारण करा अशा सुचना देऊन पंतप्रधान आवास योजनेंतर्गत घरकुलास मोफत वाळु संदर्भात तहसीलदारांशी चर्चा करून मार्ग काढुन वाळु उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करणार आसल्याचे मुख्याधिकारी विक्रम मांडुरके यांनी नागरिकांना सांगितले आहे. .मा.नगराध्यक्ष सुशील जवंजाळ,ब्रम्हदेव धुरंधरे,मा.उपनगराध्यक्ष राजेंद्र राक्षसभुवनकर, आदीसह आजी माजी नगरसेवक नागरिक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते

### पोलिसांकडून शिरुर...

धंद्यांविरोधात आपली मोहीम यापुढेही सुरू ठेवणार असल्याचे स्पष्ट केले आहे. सदर कारवाई पोलीस अधीक्षक श्री.नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी बाळकृष्ण हानपुडे पाटील, सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रविण जाधव यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक धनंजय कुलकर्णी, पोलीस हवालदार क्रमांक १५३० तुषार गायकवाड, पोलीस शिपाई क्रमांक २२२१ सतीश बहिरवाल आणि पोलीस शिपाई क्रमांक २२२९ सुनील बहिरवाल यांनी केली आहे. आरोपी नामे १) दिलीप लिंबाजी गाडे, वय- ३५ वर्ष,रा. तरडगव्हाण,ता- शिरूर कासार, जि.बीड. २) बाबासाहेब भाऊराव कदम, रा.आर्वी,ता- शिरूर कासार, जि.बीड, ३) गणेश बापूराव कासोळे,वय ३५ वर्षे, रा. भालगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४) विठ्ठल पांडुरंग बांगर वय ५५ वर्षे, रा. सावरगाव, ता. शिरूर कासार जि. बीड. ५) अंबादास रावसाहेब खेडकर, वय ३७ वर्षे, रा. भालगाव,ता. पाथर्डी जि. अहिल्यानगर. ६) सोमनाथ बबनराव मोहिते, वय ३८ वर्ष, रा. आर्वी,ता. शिरूर कासार, जि. बीड.

## पान १ वरून पुढे...

### पूर्ण नियोजन आणि...

शहर-ग्रामीण भागात शिवसेनेचे संघटन मजबूत करायचे आहे आणि शिवसेनेचा बालेकिल्ला हा बीड जिल्हाच आहे, हे दाखवून द्यायचं आहे. यामुळे पूर्ण ताकदीने कामाला लागा, स्वतःला सिद्ध करा आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकात भगवा फडकवा असे आवाहन शिवसेना बीड जिल्हा संपर्कप्रमुख बाप्पुसाहेब मोरे यांनी केले. शिवसेना मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब आणि खासदार डॉ श्रीकांत शिंदे साहेब यांच्या आदेशानुसार आणि उपनेते अर्जुन खोतकर आणि सचिव संजय मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच शिवसेना बीड जिल्हा संपर्कप्रमुख बापूसाहेब मोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत शनिवारपासून सलग तीन दिवस बीड जिल्ह्यात विधानसभा निहाय बैठकांचे आयोजन करण्यात आले होते. परळी, गेवराई, केज, माजलगाव विधानसभा मतदार संघ तसेच वडवणी येथे आढावा बैठक पार पडल्यानंतर काल दि. २१ जुलै रोजी दु. १.०० वाजताच्या दरम्यान बीड शहरातील शिवसेना मध्यवर्ती कार्यलय येथे अनिलदादा जगताप यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना बीड जिल्हा संपर्कप्रमुख बापूसाहेब मोरे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये आढावा बैठक पार पडली. या बैठकीत शिवसेनेची रणनीती, ताकद आणि संघटना या तिन्ही घटकांच्या आधारे स्थानिक स्वराज्य संस्थांमधील निवडणुकीत यश मिळवण्यासाठी नियोजन करण्यात आले. पक्ष व संघटना आणखी बळकट करण्याच्या दृष्टीने अचूक नियोजन व त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यावर भर देण्यात आला. यावेळी उपस्थित शिवसैनिकांनी यंदा शिवसेनेचा भगवा स्थानिक स्वराज्य संस्थांवर फडकवण्याचा निर्धार व्यक्त केला. याप्रसंगी जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, शिवसेना महिला आघाडी, युवासेना, शेतकरीसेना, ओबीसी व्हिजेएन्टीसेना, एसटी कामगार सेनेचे आजी-माजी पदाधिकारी लोकप्रतिनिधी, सरपंच तथा शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिवसेनेच्या यशस्वीरित्या पार पडलेल्या बैठकीचे सूत्रसंचलन प्रास्ताविक प्रतिक कांबळे यांनी केले.

### परळीच्या प्रभारी...

वरिष्ठांच्या आदेशाचे पालन केले नाही, म्हणून कनाकेला निलंबित करण्यात आले होते. माजलगाव येथून निलंबनानंतर आष्टी येथे देण्यात आले होते. आष्टी येथे असताना गायब राहणे, कार्य विवरण तक्त्याप्रमाणे कामे केली नाहीत. कनाके यांचे नियंत्रण नसल्याने १०

## पान १ वरून पुढे...

शिक्षक, मुख्याध्यापक यांच्यावर कारवाई करण्यात आली होती. प्रभारी गटशिक्षणाधिकारी पदाचा कार्यभार असताना कनाके यांच्याविषयी अनेक गंभीर तक्रारी होत्या. यामुळे गेवराई येथे कार्यरत असलेले शिक्षण विस्तार अधिकारी भिमराव नांदुरकर यांची परळी पंचायत समितीच्या गट शिक्षणाधिकारी पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. नांदुरकर यांनी यापूर्वी बीड, वडवणी, माजलगाव आदी ठिकाणी यापूर्वी प्रभारी गट शिक्षणा धिकारी म्हणून काम पाहिले आहे.

### धारूर खरेदी....

करण्याच्या मागे घेण्याच्या दिवशी उपस्थित उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज मागे घेतल्यावर ही संस्था बिनविरोध निवड झाल्याचे स्पष्ट झाले या निवडणुकीत आ प्रकाशदादा सोळुंके रमेशराव आडसकर या राष्ट्रवादीच्या दोन्ही नेत्यांनी व राष्ट्रवादीच्या वाटेवर असणारे राजाभाऊ मुंडे यांनी एकत्रित येऊन ही निवडणूक बिनविरोध होण्यासाठी एकत्रित प्रयत्न केले व ही निवडणूक बिनविरोध करण्यास त्यांना यश मिळाले आज अर्ज काढण्याच्या शेवटच्या दिवशी महिला गटातील एक जागा रिक्त राहून इतर १८ जागांवर एक एकच अर्ज राहिल्याने ही निवडणूक बिनविरोध झाल्याची निश्चित झाले मात्र या उमेदवाराची यादी प्रसिद्धी नियमानुसार उद्या सकाळी करण्यात येणार आहे पण मिळालेल्या माहितीनुसार संस्था मतदारसंघ ०९, वैयक्तिक सभासद ०५, महिला ०१, अनुसूचित जाती जमाती ०१, इतर मागासवर्गीय ०१, विमुक्त जाती जमाती ०१, एकूण १८ राहीले आहेत व महीला गटाची एक जागा रिक्त राहीली आहे.

विजयी संचालकामध्ये आ. प्रकाश दादा सोळुंके गटाचे दहा आडसकर गटाचे चार तर राजाभाऊ मुंडे गटाचे चार संचालक निवडण्यात आले असून एक महिला गटाची जागा रिक्त ठेवण्यात आली आहे यामध्ये आज निवडून आलेल्या संचालकामध्ये संस्था गटातून रामदास दत्तोपंत काकडे दामोदर राजाभाऊ वलेकर दिलीप बाळासाहेब देशमुख, बाबासाहेब भगवान बडे, नारायण वामन मैंद, अशोक रामचंद्र सोळंके, मधुकर रामकृष्ण सोळंके, नरहरी बन्सी नागरगोजे, दामोदर बंडू मुंडे यांची तर वैयक्तिक सभासद गटातून रमेश विठ्ठलराव चव्हाण, बाबुराव सोनाजी शिनगारे, तुळशीराम गंगाराम चव्हाण, श्रीराम लिंबाजी बडे, शेख युसूफ बासुमिया, यांची तर अनुसूचित जाती जमाती गटातून विश्वनाथ विठ्ठल आंबुरे इतर मागासवर्गीय गटातून ज्ञानेश्वर विष्णुपंत शिंदे महिला प्रतिनिधी

## पान १ वरून पुढे...

म्हणून प्रतिभा चंद्रकांत लगड व विमुक्त जाती भटके इतर मागासवर्गीय प्रवर्गातून रामप्रभू विश्वनाथ मुंडे या संचालकाची बिनविरोध निवड करण्यात आली असून महिला गटातील एक जागा रिक्त ठेवण्यात आली आहे या जागावाटप झाल्याने व बिनविरोध खरेदी विक्री संघाची निवडणूक झाली असून भाजपला मात्र या निवडणुकीत टाळण्यात आले आहे व सोळंके, आडसकर व मुंडे गटाने आपली सरशी पुन्हा एकदा या संस्थेवर केली आहे

### न रडता लढणं...

यांच्या संयुक्त विद्यमाने, खा.बजरंग बप्पा सोनवणे यांच्या संकल्पनेतून दिव्यांग व्यक्तींना व जेष्ठ नागरिकांना मोफत कृत्रिम साहित्य आणि साधने वाटपाच्या अनुषंगाने पूर्व तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आ.संदीप क्षीरसागर होते. यावेळी बीड शहर आणि ग्रामीण भागातील दिव्यांग आणि जेष्ठ नागरिकांना कृत्रिम साहित्य आणि साधने मोफत वाटप करण्याच्या अनुषंगाने पूर्वनोंदणी करण्यात आली. यावेळी बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जतीन रहमान, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.जाधव, जिल्हा समाजकल्याण अधिकारी श्रावस्ती मेश्राम, माजी आ.सय्यद सलीम, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, गटविकास अधिकारी श्रीमती कांबळे आदींसह दिव्यांग बांधव आणि जेष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### दक्षिण आफ्रिकेचे...

यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी भक्तांना संबोधित करत असताना परमपूज्य रामगोविंद स्वामी महाराज म्हणाले दुर्लभो मानुषो देहो देहिनां क्षणभङ्गुरः।

तत्रापि दुर्लभं मन्ये वैकुण्ठप्रियदर्शनम् मनुष्य देह दुर्लभ आहे व क्षणभंगुरही आहे. परंतु हा प्राप्त करून देखील शुद्ध भक्तांचा संग व वैकुंठाचे दर्शन दुर्मिळ भक्तांना होते. तसेच ज्या ज्या भक्तांनी वैकुंठ द्वारासाठी देणगी दिली त्यांचेही विशेष आभार श्री श्री राधा गोविंद मंदिरातर्फे करण्यात आले व त्यानंतर भाविक भक्तांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. अशी माहिती इस्कॉन बीड चे प्रतिनिधी श्रीमान कृष्णनाम दास यांनी दिली.

### खड्डा झाला...

## पान १ वरून पुढे...

आपण लक्ष घाला, बारामती जशी महाराष्ट्रासाठी आयडॉल आहे तसे बीड करा, बीड मध्ये नवं पर्वाची थीम घेऊन मिरवणाऱ्यानां आपली बारामती दाखवा. दादा आपणाकडुन शहरवासियांच्या खुप अपेक्षा आहेत याला तडा जाऊ देऊ नका. आज शिवसैनिकांनी एका खड्ड्याचे नमकरण पालकमंत्री केले तर बाकी खड्डे पालकमंत्र्याची लाभार्थी पिलावळं असल्याचे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी सांगितले.

आज बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते राजुरी वेस या मार्गांवर असणाऱ्या खड्डया संदर्भात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने आंदोलन निदर्शने करण्यात आली. या मार्गांवरील मुख्य खड्डयाला पालकमंत्री खड्डा असे नाव देऊन खड्डयाचे नामकरण करण्यात आले, तर बाकी छोटी - मोठी खड्डे पालकमंत्र्याची लाभार्थी पिलावळे असल्याचे शिवसैनिकांनी जाहीर केले. खड्ड्यात पालकमंत्र्याची प्रतिमा ठेऊन गुलाल बुक्का व हार घालून, ढोल तशे वाजवून जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी लक्षावेधी आंदोनल केले.

बीड शहरातील प्रमुख रस्ता म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज चौक ते राजुरी वेस हा होय, या मार्गांवर आज शेकडो खड्डे आहेत. या मार्गांवर नगर पालिका आहे, जिल्हा परिषद आहे. याच मार्गे विध्यार्थी शाळा- महाविद्यालयात जातात, जिल्हा रुग्णालयात नागरिक जातात, ग्रामीण भागातील शेतकरी आपला भाजीपाला घेऊन याच मार्गे बाजारपेठेत जातात, स्थानिक व्यापारी याच मार्गांवर आपले व्यवसाय करतात. अजितदादा आपण पालकमंत्री आहात, आपण एकदा शहरात फिरून सर्वे करावा म्हणजे शहरवासीयांच्या समस्या लक्षात येतील. आपणा पुढे नवपर्वांची थीम घेऊन मिरवणाऱ्या पिलावळीनां थोडी समाज द्या, त्यांना आपली बारामती फिरून दाखवा, बीड ची भानामती होऊ देऊन नका असे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी सांगितले.

यावेळीमहिला संघटिका मीराताई नवले ,उपजिल्हाप्रमुख संजय महाद्वार, उपजिल्हाप्रमुख राजुभाऊ महुवाले, रतन तात्या गुजर, विधानसभा प्रमुख सुशील पिंगळे ,नवनाथ प्रभाळे , थिगळे विशाल , गणेश लोणकर ,विनोद गोरख ,जगदीश गिराम ,प्रदीप कोठुळे, सतीश सिंह परदेशी, शरद पवार, दिलीप पवार , मच्छिंद्र काळे, चंदूनाना कागदे, प्रेम ताकतोडे, बळी कोटुळे, विशाल तांबे आदी शिवसैनिक मोठया संख्येने उपस्थित होते.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

**हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे,** E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# रा.काँ.पक्षाचे प्रदेशाध्यक्ष खा. सुनील तटकरे व आ.धनंजय मुंडे यांची शेख निजाम यांच्या घरी स्नेहभोजन व सदिच्छा भेट

## प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे साहेब व आ.धनंजय मुंढे साहेब यांचा वाढदिवस साजरा केला व बीड शहरातील विविध प्रलंबित प्रश्न संदर्भात निवेदन दिले

**बीड । प्रतिनिधी**

निर्धार नव्या पर्वाचा कार्यक्रमाच्या निमित्ताने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष खा. सुनील जी तटकरे साहेब, माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे साहेब महाराष्ट्र महिला आयोगाच्या अध्यक्षा श्रीमती रूपालीताई चाकणकर आमदार विजयसिंह पंडित प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण,जिल्हाध्यक्ष राजेश्वर आबा चव्हाण, राष्ट्रीय प्रवक्ते परांजपे,कल्याण काका आखाडे, आ.विक्रम जी काळे,मा.आ.संजयजी दौंड, रमेशराव आडसकर, डॉ. योगेश क्षीरसागर,अविनाश नाईकवाडे, गोपाळ धांडे,बिलाल पटेल, रईस चाऊस आदी मान्यवर बीड नगरीमध्ये आलेले होते सदरील आलेल्या मान्यवरांच्या स्नेहभोजनाचे आयोजन शेख निजाम व शेख अमर परिवार व मित्र मंडळातर्फे करण्यात आले होते यावेळी प्रदेशाध्यक्ष श्री सुनील जी तटकरे साहेब यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात या ठिकाणी साजरा करण्यात आला व बीड शहरातील अल्पसंख्यांक बहुल भागातील अद्याप प्रलंबित प्रश्न संदर्भात असलेल्या मागण्यांचे निवेदन देण्यात आले ज्यात प्रामुख्याने अल्पसंख्याक समाजातील मुलींच्या वस्तीग्रह, उर्दू घर, नवीन ईदगाह बालेपिर या ठिकाणी जाण्यासाठी काँक्रेट



रस्ता व ईदगाह च्या ठिकाणी काँक्रिटीकरण, बिंदुसरा पात्रातील जागा पेठ बीड विभागातील ईदगासाठी द्यावी, जुना बाजार वेस ते छत्रपती शिवाजी महाराज पुतळा पर्यंत रस्ता, बीड शहरातील प्रमुख मोठे नाले ज्यात सेंटरनाला भाजी मंडई ते बिंदुसरा नदी, इस्लामपूरा, मोमीनपुरा,गांधीनगर,मिल्लत नगर, मोहम्मदीया कॉलणी,बिलाल नगर या सर्व परिसरातील रस्ते व नाली बनवणे तसेच कंकालेश्वर मंदिर व दर्गा परिसरातील नाला , बाले पीर भागातील बांगर नाला बनवणे, बिंदुसरा नदीचे नरिमन पॉईंट धरतीवर विकास करून उद्योग व्यवसायास चालना द्यावी या संदर्भातील मागण्या प्रदेशाध्यक्ष तटकरे साहेब व आ.धनंजय मुंढे साहेब,आ. विजयसिंह पंडित यांच्याकडे करण्यात आल्या या मागण्या संदर्भात माननीय तटकरे साहेबांनी मागण्यांचे सकारात्मक चर्चा करून आदरणीय अजित दादांच्या माध्यमातून सदरील प्रश्न सोडवण्याचे आश्वासन दिले यावेळी आलेल्या सर्व मान्यवरांचे स्वागत शेख निजाम व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी कामगार आघाडीचे प्रदेश उपाध्यक्ष शेख अमर जैनुद्दीन ,खय्युम इनामदार ,सत्तार इनामदार ,शेख खदीर , सय्यद आजम, शेख जाकीर ,शेख नसिर, मोमीन जुबेर, आदींनी केले

# मुंबई लोकल साखळी बॉम्बस्फोटातील 12 दोषींची निर्दोष मुक्तता, राज्य सरकारला दणका

**मुंबई । प्रतिनिधी**

मुंबईला हादरवून टाकणाऱ्या ११ जुलै २००६ च्या साखळी बॉम्बस्फोटातील १२ दोषींची आज मुंबई उच्च न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली आहे. दोषींपैकी ५ जणांना फाशीची शिक्षाची तर ७ जणांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. या पाच जणांनी फाशीच्या शिक्षेला उच्च न्यायालयात आव्हान दिलं होतं. उच्च न्यायालयाने त्यांचा अपील मान्य केला. फाशीची शिक्षा रद्द करू नये अशी मागणी राज्य सरकारकडून करण्यात आली होती. पण न्यायातायने दिलेल्या



निर्णयामुळे राज्य सरकारला दणका बसला आहे.१२ दोषींपैकी एकाचा आधीच मृत्यू झाला आहे. तर ११ जणांचा आता तुरुंगाबाहेर येण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. १९ वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीनंतर दोषींची निर्दोष मुक्तता झाली आहे. गेली १९ वर्ष यातील दोषी एकही दिवस तुरुंगाबाहेर आले नव्हते. मुंबईत ११ जुलै २००६ रोजी संध्याकाळी साडेसहा वाजताच्या सुमारास लोकलमध्ये एकूण ७ ठिकाणी बॉम्बस्फोट झाले होते. माटुंगा, माहीम, बांद्रा, जोगेश्वरी, बोरीवली, कांदिवली, मीरारोड या रेल्वे स्थानकांदरम्यान स्फोट झाले होते. यात २०९ हून अधिक जणांचा मृत्यू झाला होता.

# तय्यबनगर, कोरबू गल्ली,संजयनगर येथील वक्फ बोर्डाच्या इनामी जागेवर घरकूल योजनेचा लाभ मिळावा यासाठी सरसकट सर्वेक्षण करा

## बाळराजे पवारांनी केली वक्फ बोर्ड अध्यक्ष समीर काझी यांच्या कडे मागणी

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई शहरातील तय्यबनगर, कोरबू गल्ली, संजयनगरसह इतर भागातील वक्फ बोर्डाच्या इनामी जागेवर प्रधानमंत्री आवास ( घरकूल) योजनेचा लाभ मिळावा, यासाठी माजी आमदार लक्ष्मण पवार आणि लोकनेते बाळराजे पवार यांनी महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्डाचे अध्यक्ष समीर काझी यांच्याकडे या भागाचे सर्वेक्षण करुन कायदेशीर भाडे पट्टे देण्याची आग्रही मागणी केली. बाळराजे पवार यांनी बीड येथे काझी यांच्या निवासस्थानी प्रत्यक्ष भेट घेऊन ही मागणी मांडली. काझी यांनी



कायदेशीर मार्गाने नागरिकांना हक्क मिळवून देण्यासाठी सकारात्मक पावले उचलण्याचे आश्वासन दिले.

गेवराई नगरपालिकेमार्फत घरकूल योजनेसाठी ४३८ नागरिकांनी अर्ज केले असून, त्यांचे सर्वेक्षण सुरू आहे. तसेच, ४०० हून अधिक नागरिकांनी अर्ज केले नाही म्हणून त्यांचे ही अर्ज घेऊन सर्वांना लाभ मिळावा, यासाठी सरसकट सर्वेक्षण करून भाडेपट्टा देण्याची कार्यवाही जलदगतीने करावी, अशी मागणी माजी.आ. लक्ष्मण पवार ,बाळराजे पवार यांनी केली. वक्फ बोर्डाच्या जागेवरील सर्वेक्षणामुळे गरजू नागरिकांना प्रधानमंत्री आवास (घरकूल) योजनेचा लाभ मिळण्यास मदत होणार आहे. काझी यांनी यापूर्वी घेतलेल्या लोकहितकारी निर्णयांमुळे गेवराईतील नागरिकांना दिलासा मिळाला आहे. या भेटीवेळी एकता युवा मंचचे अध्यक्ष जावेद कुरैशी, सय्यद एजाज, जुनेद बागवान, नईम पठाण, शेख इर्शाद उपस्थित होते. बाळराजे पवार यांनी काझी यांच्या सहकार्याचे आणि लोकहितकारी दृष्टिकोनाचे कौतुक केले. गेवराईतील नागरिकांना न्याय मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# शिवणी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात कार्यानुभव विषय शिक्षकांची कार्यशाळा संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

आदर्श शिक्षण संस्था,बीड संचलित-शिवणी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,शिवणी ता.जि.बीड विद्यालयात दि.२१/०७/२०२५ रोजी संस्था अंतर्गत कार्यानुभव विषय शिक्षकांची कार्यशाळा उत्साहात संपन्न झाली.सर्वप्रथम विद्येची देवता सरस्वती,स्व. काकू-नाना यांच्या प्रतिमेचे पुजन आदर्श शिक्षण संस्थेचे प्रशासन अधिकारी मा.डॉ. आर.जी.मचाले साहेब,संस्थेचे कार्यवाहक मा.श्री.एम.ए.राऊत साहेब,तज्ञ मार्गदर्शक श्री.जाडकर आर.डी.विद्यालयाचे प्राचार्य श्री.येडे व्ही.बी.यांच्या हस्ते करण्यात आले.कार्यक्रमाची सुरुवात स्वागत गिताने करण्यात आली.विद्यालयाच्यावतीने कार्यक्रमाचे अध्यक्ष मा.श्री. डॉ.मचाले साहेब,कार्यक्रमाचे प्रमुख पाहूणे मा.श्री.राऊत साहेब व तज्ञ मार्गदर्शक श्री.जाडकर आर. डी.यांचे स्वागत प्राचार्य श्री.येडे



व्ही.बी.यांनी शाल,श्रीफळ व पुष्पगुच्छ देवून केले.तज्ञ मार्गदर्शक श्री.जाडकर सर यांनी कार्यशाळेमध्ये शिक्षकांना मोलाचे मार्गदर्शन केले व कागदापासुन विविध वस्तु तयार करुन दाखवल्या.विद्यालयातील श्रीमती वाघमारे मॅडम यांनी कार्यशाळेमध्ये शिक्षकांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्तविक विद्यालयाचे प्राचार्य श्री.येडे व्ही.बी.यांनी केले.प्रास्तविकामध्ये कार्यानुभव शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये श्रमप्रतिष्ठा व स्वावलंबनाची मुल्ये रुजवणे व विद्यार्थांचा सर्वांगिण विकास घडुन येण्यासाठी कार्यानुभव शिक्षण महत्वाचे आहे,असे विचार व्यक्त केले.कार्यक्रमाचे प्रमुख पाहूणे मा.श्री.राऊत साहेब यांनी कार्यशाळेस मार्गदर्शन करताना कार्यानुभव शिक्षणाचे महत्व विशद केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा आदर्श शिक्षण संस्थेचे प्रशासन अधिकारी मा.श्री.मचाले साहेब यांनी कार्यशाळेमध्ये शिक्षकांना मार्गदर्शन करताना संस्था स्तरावर कार्यानुभव विषय शिक्षकांची कार्यशाळा आयोजित करण्याचा उद्देश स्पष्ट केला.विद्यार्थ्यामध्ये शिस्त,सहभाग,सहकार्य स्वावलंबन व संस्कार रुजवण्यासाठी कार्यशाळाचे आयोजन करणे काळाची गरज आहे,असे मोलाचे विचार व्यक्त केले.

# सहकार, शिक्षण क्षेत्रात मंगलाताई सोळंके यांचे कार्य नोंद घेण्यासारखे

## प्रसिद्ध उद्योजिका सौ.राजश्रीताई हेमंत पाटील यांचे गौरवोद्गार



### ● मंगलाताई सोळंके यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्याला गर्दी

**माजलगाव । प्रतिनिधी**

महिला कोणत्याही क्षेत्रात कमी नाहीत, त्याला सहकार क्षेत्रही कसे अपवाद असेल. माजलगाव विधानसभा मतदारसंघात सौ.मंगलाताई प्रकाशदादा सोळंके यांचे सहकार क्षेत्रात मोठे योगदान आहे. राजकीय आणि सामाजिक पटलावर मंगलाताई यांनी आपली वेगळी ओळख निर्माण केली, असे गौरवोद्गार नांदेडच्या गोदावरी उद्योग समुहाच्या सर्वेसर्वा सौ.राजश्रीताई हेमंत पाटील यांनी माजलगाव येथे काढले. त्या माजलगाव विकास प्रतिष्ठानच्या अध्यक्षा सौ.मंगलाताई प्रकाशदादा सोळंके यांच्या ७० व्या वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन सोहळ्यात प्रमुख अतिथी म्हणून बोलत होत्या. या अभिष्टचिंतन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नेते डॉ.प्रकाशराव आनंदगावकर होते तर मंचावर आमदार प्रकाशदादा सोळंके, माजी आमदार मोहनराव सोळंके, राधाकृष्ण होके पाटील, उद्योजक डॉ.आर.जी.बजाज, आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

**● या अभिष्टचिंतन सोहळ्यात बोलताना आमदार प्रकाशदादा सोळंके म्हणाले, माझ्या सामाजिक आणि राजकीय जीवनात सौ.मंगला यांचे अमूल्य योगदान आहे. जीवनातील संघर्षाच्या काळात त्यांनी दिलेली खंबीर साथ विसरणे शक्य नाही. आज त्यांचा ७० वा वाढदिवस आणि अभिष्टचिंतन सोहळा होत आहे. त्यांचा शंभरावा वाढदिवस साजरा करण्याचे भाग्य मला लाभावे, अशा सदिच्छा आमदार सोळंके यांनी व्यक्त केल्या.**

**● सत्काराला उत्तर देताना सौ.मंगलाताई सोळंके म्हणाल्या, महिला सक्षमीकरण काळाची गरज आहे. याबाबत प्रत्येक महिलेने जागरूक होणे गरजेचे आहे. महिलांनी आपापल्या क्षेत्रात प्रगती करावी. माजलगाव विकास प्रतिष्ठानच्या माध्यमातून महिलांना सक्षमीकरणासाठी बळ देण्याचे भाग्य मला लाभले. माजलगावकरांच्या जिव्हाळ्यातून उतराई होणे शक्य नाही, माझ्यासाठी हा अभिष्टचिंतन सोहळा जीवनातील एक अविस्मरणीय क्षण आहे, असे भावपूर्ण उद्गार सौ.मंगलाताई सोळंके यांनी काढले.**

# शालिनी धर्मराज सुलाखे यांचे दु:खद निधन

**बीड । प्रतिनिधी**



चकलंबा येथील स्व धर्मराज सुलाखे यांच्या पत्नी श्रीमती शालिनी सुलाखे वय ७८ वर्ष यांचे वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. चकलांबा तालुका गेवराई येथील श्रीमती शालिनी धर्मराज सुलाखे (वय ७८) यांचे वृद्धापकाळमुळे २० जुलै रविवार रोजी दुःखद निधन झाले आहे.त्या अत्यंत मनमिळाऊ आणि धार्मिक स्वभावाच्या होत्या,रविवारी सायंकाळी चकलांबा येथे ५ वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात ४ मुले, सुना, नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे, विस्तार अधिकारी अरविंद, शिक्षक धनंजय, शिक्षक उदय,आणि चकलंबा येथील डॉ.विजय सुलाखे यांच्या त्या मातोश्री होत,अंत्यविधीसाठी गावातील ग्रामस्थासह छत्रपती संभाजीनगर,पैठण,गेवराई, बीड येथील नागरिक उपस्थित होते.

# छत्रपती शिवाजी महाराज चौक ते जुना बाजार कोतवाली वेस पर्यंत रस्त्याचा काम तात्काळ सुरु करा

## अन्यथा १४ ऑगस्टपासून बेमुदत धरणे आंदोलन : अमरजान पठाण

**बीड । प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज चौक ते राजुरी वेस, कारंजा रोड, बलभीम चौक, जुना बाजार ते कोतवाली वेस पर्यंतच्या रस्त्याचा काम तात्काळ सुरू करण्यात यावा अन्यथा येत्या १४ ऑगस्ट रोजी सकाळी ११:०० वाजता बीड नगरपरिषदेसमोर बेमुदत धरणे आंदोलन छेडण्यात येईल, असा थेट इशारा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे शहराध्यक्ष अमरजान पठाण यांनी आज दिला.

पठाण यांनी दिलेल्या निवेदनात स्पष्ट करण्यात आले की, बीड शहराच्या मध्यवर्ती भागातून जाणारा छत्रपती शिवाजी महाराज चौक ते राजुरी वेस, कारंजा रोड, बलभीम चौक, जुना बाजार ते कोतवाली वेस पर्यंतचा हा



रस्ता नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाचा असून सध्या याची दुरवस्था झाली आहे. रस्त्यावर ठिकठिकाणी खोल खड्डे पडले असून, पावसामुळे ते जलमय झाले आहेत. त्यामुळे वाहतुकीस अडथळा तर निर्माण झालाच आहे, शिवाय कोणताही जीवघेणा अपघात होण्याचा धोका निर्माण झाला आहे.हा रस्ता शहरातील प्रमुख व्यापारी मार्ग असून, दररोज जिल्हाभरातून व्यापारी व नागरिक या भागात ये - जा करतात. रस्त्याची ही अवस्था नागरिकांच्या संयमाचा अंत पाहणारी ठरत आहे.

मनसेने प्रशासनाला इशारा दिला आहे की, जर तात्काळ रस्त्याच्या कामाला सुरुवात झाली नाही,तर १४ ऑगस्ट गुरुवार रोजी सकाळी ११:०० वाजल्या पासून बीड नगर परिषदेसमोर बेमुदत धरणे आंदोलन करण्यात येईल असे बीड नगरपरिषद कार्यालय, कार्यकारीअभियंता बीड,व जिल्हाधिकारी कार्यालयात दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे.


## वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**गेवराई, जि. बीड येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्री. आर. ए. मिसाळ यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ६२३ /२०२५**

**रंजना सतिष दळवी विरूध्द निरंक**

ज्याअर्थी मयत नामे सतीष छगनराव दळवी हे / हया दिनांक २१/४/२०२५ रोजी मोजे खळेगाव ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले / झाल्या आहेत. अर्जदार क.१. रंजना प्र सतिष दळवी, वय - ४२ वर्षे, धंदा - शेती, रा. खळेगांव ता. गेवराई, जि. बीड, २ . यश सतिष दळवी वय: १२वर्षे, अ.पा. क. आई अर्जदार क. १ . रंजना अ सतिष दळवी रा. सदर ३. रोशनी पि. सतीष दळवी, वयः १० वर्षे, अ.पा. क. आई अर्जदार क.१. रंजना अ सतिष दळवी रा. सदर ४. छगन पि. रामभाउ दळवी वयः ७१ वर्षे धंदा : शेती रा. खळेगांव ता. गेवराई, जि. बीड ५. लताबाई प्र. छगन दळवी वय: ६५ वर्षे धंदा: शेती रा. खळेगांव ता. गेवराई, जि. बीड यांनीशासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारसप्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे सतीष छगनराव दळवी यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक १९/०७/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख २८/०८/२०२५

**(मार्फत - ॲड बी. के. निकाळजे, गेवराई)**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर,गेवराई**

**(स्वाक्षरीत)**
**क.लिपीक**

शिक्का

## जाहीर प्रगटन

**मा. श्री. एल. एस. चव्हाण, न्यायाधीश, कौटुंबीक न्यायालय बीड, जि.बीड यांचे न्यायालयात**

**पीटीशन ए. क्रमांक १०५/२०२४.**

**योगेश वि. शितल**

अर्जदार :- योगेश पि. बापुराव रोमन, वय ३० वर्षे, धंदा मजुरी, सध्या निरंक रा. भागयनगर, तुळजाई चौक ता. जि. बीड मो. नं ८६६८५६७३२०

विरूध्द

गैरअर्जदार क्र २ :- कोंडीराम पि. हनुमान गायकवाड, वय : ३५ वर्षे, धंदा व्यापार वहान चालक, रा. जेजुरी राडे बेकराईनगर व्ही.टी.सी. ट्रान्सपोर्ट हडपसर पुणे. मो नं ८७६६९०२१९८

मागणी :- कलम १३ (i-a) हिंदु विवाह कायदा, १९५५ प्रमाणे अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ यांचेतील विवाह विच्छेदनाचा हुकूमनामा होणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार **योगेश पि. बापुराव रोमन, वय: ३० वर्षे, धंदा : मजुरी, सध्या निरंक रा. भागयनगर, तुळजाई चौक ता. जि. बीड मो. नं ८६६८५६७३२०** यांनी या न्यायालयात असा अर्ज दिला आहे की, अर्जदार यांचा अर्ज मंजुर करून दिनांक १२.०५.२०१८ रोजी झालेला विवाह विच्छेदित करून हुकूमनामा करण्यात यावा अशी मागणी केलेली आहे.

ज्याअर्थी यासंबंधी आक्षेप असेल तर त्यांनी सदरील प्रगटन प्रसिध्दीपासून ३० तीस दिवसांच्या आत या न्यायालयासमोर स्वतः किंवा वकीलामार्फत हजर रहावे. अन्यथा अर्जाची सुनावणी होवून नियमाप्रमाणे आदेश दिला जाईल.

आज दिनाक २१/०७/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

**पुढील तारीख १९/०८/२०२५**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**प्रबंधक (दि.वि. शेंडगे)**
**कौटुंबिक न्यायालय बीड**

**(स्वाक्षरीत)**
**क.लिपीक**

शिक्का

दैनिक मराठवाडा पत्र
https://marathwadapatra.com
मंगळवार, दि.२२ जुलै २०२५ पान ४

## विजेचा शॉक लागून खडकवाडी येथील चि.वैभव वैजनाथ सानप या तरुणाचा मृत्यू

डोंगर किनी । प्रतिनिधी



रविवार दिनांक १३ जुलै २०२५ रोजी शेतात पाणी देत असताना वैभव वैजनाथ सानप वय सोळा वर्षे पाण्यात विजेची तार तुटून पडलेली होती व त्याच पाण्यामध्ये पाय पडल्याने जागीच मृत्यू झाला. सविस्तर वृत्तांत असे की खडकवाडी येथील ऊसतोड कामगार वैजनाथ सानप यांचा मुलगा वैभव वैजिनाथ सानप इयत्ता अकरावी मध्ये शिकत असलेला सोळा वर्षे वयाचा मुलगा शेतात पाणी देण्यासाठी गेलेला असताना पाणी अचानक बंद झाले ते पाहण्यासाठी विहिरीकडे निघालेला होता मध्येच विजेची तार तुटून पाण्यात पडलेली त्याला ▶▶ उर्वरित पान २ वर

# युवा सेनेने छत्री वाटपाचा कार्येक्रम राबवला 'नेता भी खुश और कार्येकर्ता भी खुश' करण्यासाठी

बीड । प्रतिनिधी

'नेता भी खुश और पब्लिक भी खुश अशी राजकीय कार्येक्रमाची पद्धत आता हळू हळू संपत चालली म्हणायची की काय ?असा प्रश्न आता उभा राहू लागला आहे. एखाद्या राजकीय प्रस्थाचा कार्येक्रम असला की, त्याच पक्षाचे कार्येकर्ते, विभागातील पदाधिकारी, मग आपल्या अमुक तमुक नेत्याच्या हस्ते हा कार्येक्रम होणार आहे त्यामुळे या कार्येक्रमास पब्लिक जास्तीत जास्त जमा व्हावी म्हणून काही तरी वाटपाचा कार्येक्रम ठेवायचा म्हणजे या कार्येक्रमास पब्लिक सुद्धा जास्तीत जास्त उपस्थित होते, आपण केलेल्या वाटपाच्या कार्येक्रमामुळे आपले नाव सुद्धा होते, आणी आपला नेता सुद्धा खुश होऊन आपण केलेल्या सामाजिक कामावर आणी कार्यक्रमाच्या नियोजनावर खुश होऊन शाबसकी सुद्धा देतो. म्हणजे एका दगडात अनेक पक्षी मारण्याची कला या कार्येकर्त्यांना, किंवा अमुक तमुक पदाधिकाऱ्यांना आलेली असते. मात्र आता आपला नेता ते पब्लिक यांना जोडणाऱ्या अशा वाटपाच्या कार्येक्रमात सुद्धा लबाड लांडग ढोंग करतंय... लगीन करायचं सोंग करतंय असले ढोंग बघायला मिळायला लागले आहेत. आता पब्लिक ला अमुक तमुक वस्तूच्या वाटपाचं गाजर दाखवायचं आणी त्यातल्या चार दोन वस्तू आपल्या आलेल्या नेत्यांच्या हस्ते वाटप करायच्या आणी फोटो काढून झाले रे झाले की, तुम्हाला वाटप करणार म्हणून आणलेली पब्लिक वाऱ्यावर सोडून द्यायची आणी ह्या वस्तू आपल्या कार्येकर्त्यांनाच वाटायच्या. म्हणजे पाहिलं नेता भी खूष और पब्लिक भी खूष ही पद्धत आता बंद करून या नेत्याला खुश करणाऱ्या कार्येकर्त्यानी नवी पद्धत सुरु केली आहे आणी ती म्हणजे नेता भी खुश और कार्येकर्ते भी खुश

हीच नवी पद्धत खास करून उभ्या महाराष्ट्राला बघायला मिळाली ते उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या शिव सेना पक्षाच्या युवा सेने कडुन. निमित्त होते राज्याचे परिवहन मंत्री तथा धाराशिव चे पालकमंत्री असणारे प्रताप सरनाईक यांच्या हस्ते वृक्ष लागवडीचा कार्येक्रम आयोजित करण्यात आला होता. आणी यावेळी या वृक्ष लागवडच्या कार्येक्रमास धाराशिव मधील शालेय विद्यार्थी यांना पावसाळी छत्र्या तुम्हाला वाटप करणार आहोत म्हणून बोलावण्यात आले होते. आणी हा स्पेशल छत्री वाटपाचा कार्येक्रम मराठवाडा युवा सेनेच्या पदाधिकारी असणाऱ्या बाजीराव चव्हाण यांनी आयोजित केला होता अशी सुद्धा माहिती मिळत आहे. या कार्येक्रमास हे शालेय विदयार्थी कार्येकर्माच्या अगोदर दोन ते अडीच तास या ठिकाणी बोलावून ताटकळत ठेवले होते ▶▶ उर्वरित पान २ वर

## संत माऊलींचा जयघोष करत धाकलगाव, गेवराई मार्गे दिंडीचे चाकरवाडीकडे प्रस्थान

### मोठ्या संख्येने भक्त सहभागी

गेवराई । प्रतिनिधी



गेल्या अनेक वर्षांपासून धाकलगाव, गेवराई, येथील माऊली भक्तगण मंडळींच्या वतीने आषाढ महिन्यांत धाकलगाव, गेवराई मार्गे चाकरवाडी अशी पायी दिंडीचे आयोजन करण्यात येत असून याही वर्षी दि.२० जुलै रोजी धाकलगाव येथुन पायी दिंडीचे गेवराई मार्गे चाकरवाडीकडे प्रस्थान झाले आहे. दिंडीत धाकलगाव, गेवराई येथील महिला व पुरुष भाविकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला आहे.

विसाव्या शतकातील महान संत विभूती संत ज्ञानेश्वर माऊली महाराज श्रीक्षेत्र चाकरवाडी येथे दर्शनासाठी आषाढ वारी निमित्ताने दरवर्षी माऊली भक्तगण मंडळींच्या वतीने पायी दिंडीचे आयोजन करण्यात येते दरम्यान या दिंडीचे दि.२० जुलै रोजी धाकलगाव येथून प्रस्थान होवून हि दिंडी धाकलगाव, शहागड, गेवराई, गढी, रांजणी, पाडळसिंगी, हिरापुर, पेंडगाव, बीड ,कपिलधार, मांजरसुबा, नेकनुर यामार्गे चाकरवाडीत दाखल होणार आहे. या दिंडीचे माऊली भक्त अंबादास गिरी, विठ्ठल जगदाळे, वादे, दशरथ गावडे, बळीराम उडें, अशोक बीडे, यांच्या वतीने आयोजन केले जात आहे.

## नगररोडवर अपघात होऊ नये म्हणून 'यू-टर्न'नाही असे तांत्रिक कारणे सांगणारे अभियंता राजेंद्र भोपळे यांना 'मोतिबिंदू' झालाय का?

### बीड शहरांतर्गत धुळे-सोलापूर महामार्गावरील दुभाजक नसल्याने वाढते अपघात दिसत नाहीत काय ? ? : डॉ. गणेश ढवळे

बीड । प्रतिनिधी



छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते नगरनाका दरम्यानच्या रस्त्यावर यू-टर्नसाठी दुभाजकात जागा सोडलेली नाही. या मार्गावरच्या उत्तरेकडील बाजूस जिल्हा न्यायालय, तहसील, सामाजिक न्याय भवन, जिल्हाधिकारी कार्यालय तर दक्षिणेकडील बाजूस शासकीय आरोग्य प्रशिक्षण केंद्र, शासकीय विश्रामगृह, पंचायत समिती, चंपावती क्रीडा मंडळ अशी अनेक महत्त्वाची ठिकाणे आहेत. या ठिकाणी जाण्यासाठी नागरिकांना नगरनाका गाठून पावणेकिलोमीटरचा फेरा मारावा लागतो.

यापूर्वी या मार्गावर सहा ठिकाणी यू-टर्नची सोय होती, मात्र यावेळी एकही ठेवण्यात आलेला नाही. सामाजिक कार्यकर्त्यांनी निवेदने दिली, आंदोलने केली, लोकप्रतिनिधींनीही जिल्हाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत बैठका घेतल्या, स्थानिक दैनिकांनी वारंवार प्रश्न उपस्थित केला तरी राज्य महामार्ग प्राधिकरणाचे अभियंता राजेंद्र भोपळे यांनी अपघात टाळण्यासाठी यू-टर्न नाही असा युक्तिवाद करून छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते चहाटा फाटा दरम्यान केवळ तीन ठिकाणी (नगरनाका, धानोरा रोड, कालिकानगर कमान) यू-टर्न दिले आहेत. परंतु जिल्हाधिकारी कार्यालय किंवा तहसील कार्यालयासमोर यू-टर्न देण्यास तांत्रिक अडचण असल्याचे सांगून त्यांनी असहमती दर्शवली आहे.

मग बीड शहरांतर्गत धुळे-सोलापूर ▶▶ उर्वरित पान २ वर

## मोफत वाळु संदर्भात तहसीलदारांशी चर्चा करुन मार्ग काढण्यात येईल: मुख्याधिकारी विक्रम मांडुरके

### शहरातील समास्याचे निराकरण करण्यासाठी बाळराजे पवारांची नगरपालिकेत आढावा बैठक संपन्न

गेवराई । प्रतिनिधी



शहरातील विविध भागातील नागरिकांच्या समास्या संदर्भात गेल्या सोमवारी बाळराजे पवार यांनी जनता दरबार आयोजन केले होते त्यावेळेस शहरातील नागरिकांनी उपस्थित केलेल्या समस्याचे काय झाले यांचा आढावा घेण्यासाठी बाळराजे पवार यांनी आज ▶▶ उर्वरित पान २ वर

## शिरूर कासार पोलिसांनी फसवणूक प्रकरणातील फरार आरोपीला अटक केले

शिरूर का.। प्रतिनिधी




पोलीस स्टेशनने गुन्हा क्रमांक १४८/२४, कलम ४०६, ४२० भा.दं.वि. अंतर्गत मागील एक वर्षापासून फरार असलेल्या आरोपी रवींद्र मनसुख बांदल, रा. कानोबाची वाडी, ता. शिरूर कासार, जि. बीड याला अटक केली आहे.

तांत्रिक तपासाच्या आधारे पोलिसांनी आरोपीचा शोध घेऊन त्यास पुणे जिल्ह्यातील पिंपरी चिंचवड येथील मोरे वस्ती, श्रीराम कॉलनी येथून ताब्यात घेतले. १९ जुलै २०२५ रोजी त्याला अटक करण्यात आली. आरोपीकडून गुन्ह्यात फसवणूक करून नेलेला एकूण ४९,०८८/- रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे, ज्यात १३,६००/- रुपये रोख रक्कम, जिओ कंपनीचा वायफाय सेटअप आणि इतर इलेक्ट्रॉनिक वस्तू (किंमत ३५,४८८/- रुपये) यांचा समावेश आहे.

सदर कारवाई श्री.नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी बाळकृष्ण हानपुडे पाटील, सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रविण जाधव यांचे मार्गदर्शनाखाली अधिकारी पोलीस हवालदार १२४५ बाळासाहेब सुरवसे आणि पोलीस हवालदार ७४३ राहुल नांगरे यांनी केली आहे.

## कोथिंबीर ला कवडीमोल भाव मोठेवाडीच्या शेतकऱ्याने फिरवला नांगर



माजलगाव । प्रतिनिधी

प्रत्येक भाजीला फोडणीसाठी लागणारी कोथिंबीर ची किंमत कवडीमोल झाल्याने मोठेवाडी येथील शेतकऱ्यांनी आपल्या एक एकर कोथिंबीर वर नांगर फिरवल्याचे पाहायला मिळाले.

शेतकऱ्याला आसमानी संकटा सह सुलतानी संकटाचा सामना करावा लागत आहे आसमानी संकटातून सावरलेला शेतकरी नक्कीच सुलतानी संकटात अडकतो असे चित्र निर्माण झाले आहे कोथिंबिरीला चांगला भाव मिळेल व आपली १८ पिढ्या असलेल दारिद्र्य संपुष्टात येईल म्हणून मोठेवाडी येथील नाथा गुलाब किनोळकर या शेतकऱ्यांने बँकेकडून कर्ज काढून आपल्या शेतात एक एकर कोथिंबीर लावली तिची मोठ्या प्रमाणात मशागत करून हिरवगार लुसलुशीत कोथिंबीरीचे पीक उदयाला आले मात्र अचानक बाजारातील कोथिंबीरीचे भाव कमी झाले कवडीमोल म्हणायलाही हरकत नाही यामुळे शेतकऱ्याने हवालदिल होऊन आपल्या शेतातील एक एकर कोथिंबिरी पिकावर नांगर म्हणजेच ट्रॅक्टर फिरवला यामुळे शेतकरी पुन्हा आर्थिक संकटात सापडणार असल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

# तालुक्यात १० हजार ४११ घरकुल बांधकाम सुरु, मात्र बीड पं.स. कडून रोहयो मस्टर बंद

### शुक्रवारी मागण्या घ्याव्यात अन्यथा सर्व लाभार्थीसह आंदोलन करणार : धनंजय गुंदेकर

बीड । प्रतिनिधी

पंचायत समिती बीडकडून काही काळापासून घरकुल योजनेतील रोजगार हमी योजनेची मस्टर बंद आहेत.. या मस्टर बंद असण्याने लाभार्थ्यांना आपल्याच घराच्या बांधकामावर काम केल्याची शासकीय रोजगार हमी योजनेची मजुरी मिळत नाही. नियमानुसार या लाभार्थ्यांना पहिला हप्ता वर्ग केल्यानंतर रोजगार हमी योजनेचे अनुदान मिळण्यासाठी मस्टर सुरू असायला हवे होते मात्र तसे झालेले दिसून येत नसल्याचं धनंजय गुंदेकर यांनी म्हटले आहे. बीड तालुक्यात १२५२१ घरकुले मंजूर आहेत. यातील पहिला हप्ता हा १० हजार ४११ लाभार्थ्यांना देण्यात आलेला असून दुसरा हप्ता हा ४ हजार ४२३




लाभार्थ्यांना दिलेला असल्याची माहिती मिळत आहे. मात्र रोजगार हमी योजनेच्या अनुदानासाठी लाभार्थ्यांकडून मागणी होत असूनही मस्टर बंद असल्याने बीड तालुक्यातील हजारो लाभार्थ्यांना हक्काचे पैसे हे बांधकाम सुरू असताना मिळत नाहीत. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी याकडे प्राधान्याने लक्ष देणे आवश्यक आहे. या आठवड्यात घरकुलाच्या मागण्या सुरू कराव्यात अन्यथा तालुकाभरातील लाभार्थ्यांना सोबत घेऊन पंचायत समिती समोर आंदोलन करण्यात येईल असा इशारा धनंजय गुंदेकर यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिला आहे.

## पोलिसांकडून शिरूर कासार येथे जुगारावर छापा; सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल

शिरूर का.। प्रतिनिधी



शिरूर कासार पोलीस स्टेशन पोलीस पथकाने दिनांक २० जुलै २०२५ रोजी आर्वी शिवारात एका शेतात लिंबाच्या झाडाखाली सुरू असलेल्या तिरट जुगारावर छापा टाकत कारवाई केली आहे.

पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, पथकाने दुपारी ४.३० वाजताच्या सुमारास आर्वी शिवारातील नमूद केलेल्या शेतात छापा मारला. या छाप्यात पोलिसांनी जुगार खेळणाऱ्या सहा इसमांना रंगेहाथ पकडले. त्यांच्याकडून रोख रक्कम ४,२९०/- रुपये आणि चार मोटरसायकल असा एकूण ३,२५,१३०/- रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

याप्रकरणी सर्व सहा आरोपींविरुद्ध शिरूर कासार पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा रजिस्टर क्रमांक २१३/२५ नुसार महाराष्ट्र जुगार अधिनियम कलम १२ (अ) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी अवैध ▶▶ उर्वरित पान २ वर

